# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/09/2023 (सोमवार) दुपार


**गोंडखैरी पारधी बेडा येथील अवैध्य दारू भट्टीवर छापे २३ लाख ५८ हजार ५० रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**कळमेश्वर पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची संयुक्त प्रतिबंधक कारवाई**

कळमेश्वर पोलिस स्टेशन हद्दीतील गोंडखैरी येथील पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून तिची मोठ्या प्रमाणावर आजुबाजुचे परीसरात विक्री होत असल्याची गोपनिय खबर कळमेश्वर पोलिसांना मिळाल्याने मा. पोलिस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), मा. अपर पोलिस अधिक्षक श्री डॉ. संदिप पखाले, मा. उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अजय चांदखेडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक प्रभारी ओमप्रकाश कोकाटे यांचेसह पोलिस स्टेशन कळमेश्वरचे प्रभारी अधिकारी श्री. यशवंत सोळसे यांचे नेतृत्वाखाली आज दिनांक १८/०९/२०२३ रोजी पहाटे ०७.०० वा. सुमारास पोलिस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी पारडी बेडा येथे सुरू असलेल्या अवैध दारू भट्टीवर छापे मारून एकुण जवळपास २३ लाख ५८ हजार ५० रूपयाचा मुद्देमाल जप्त करून एकुण १३ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये कारवाई करण्यात आली आहे. सर्व आरोपीतांवर पोलिस स्टेशन कळमेश्वर येथे दाखल करण्यात आले असुन सदर कारवाई दरम्यान एकुण २१ हजार २६० लिटर कच्चे रसायन सडवा किंमती २१ लाख २६ हजार रू., १५७३ लिटर तयार दारू किंमती ०१ लाख ५७ हजार ३०० रू. जप्त करण्यात आली असून दारूभट्टी साठी लागणारे एकुण इतर साहित्य ड्रम, घमेले व दारू तयार करणेकामी लागणारे साहीत्य किंमती अंदाजे ७४७५०/—रू. जप्त करून गावठी दारूच्या भट्ट्या उद्धवस्त करण्यात आल्या आहे.

सदर कारवाईसाठी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठाणेदार श्री. यशवंत सोळसे, सहायक पोलीस निरीक्षक दिलीप पोटभरे, तेजराम मेश्राम, पोलीस उपनिरीक्षक मनोज टिपले, महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम व इतर ३३ पोलीस अंमलदार तसेच स्थानिक गुन्हे शाखा नागपूर येथील पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे तसेच २० अंमलदार, पोलीस मुख्यालयाचे आर. सी. पी पथक त्याचप्रमाणे नागपूर शहरचे अधिकारी व ५० अंमलदार यांनी पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर